महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मोहोळ, माढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यांतील आष्टी तलावाला पाणीपुरवठा करण्याबाबत

(१) ४२४५२ (२१-०४-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ, माढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यांतील आष्टी तलाव हा पूर्णपणे कोरडा पडला असल्याने गावातील नागरीकांना उन्हाळयाआधीच पाण्यासाठी भटंकती करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील तलाव कोरडा पडल्यामुळे करोडो मासे मृत्यूमुखी पडले असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून या तलावावर अवलंबून असणारे शेती, मासेमारी आदी व्यवसाय अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आष्टी तलावात पाणी साठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०१-२०१८) : (१) नाही.

दि.०१/०१/२०१५ रोजी आष्टी जलाशयात ७४.५८ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. सदर पाणीसाठा दि.१६.१२.२०१५ रोजी निरंक झाला होता.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हाधिकारी सोलापूर यांचे मागणीनुसार दि.०८/०२/२०१६ ते दि.१४/०२/२०१६ या कालावधीत पिण्यासाठी उजनी धरणातून डाव्या कालव्याद्वारे १३.३२ दलघमी (४७० दलघफू) पाणी सोडून, आष्टी (येवती) तलावात ८.५५ दलघमी (३०२ दलघफू) इतका पाणीसाठा करणेत आलेला होता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाई

(२) ५१८९४ (३०-०४-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे जिल्ह्याला पाणी पुरवठा करणाऱ्या बारवी व आंध्र धरणातील पाणीसाठा कमी झाला असल्याने जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे मुंबई व ठाणे येथे प्रत्येक शनिवारी व रविवारी दोन पाणी कपात करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शहरांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०१-२०१८) : (१) होय, अंशत: खरे आहे.

बारवी व आंध्र धरणातून फक्त ठाणे जिल्ह्यास पाणी पूरवठा होतो. मुंबई जिल्ह्यास या धरणातून पाणी पुरवठा होत नाही. दरवर्षीपेक्षा ३३% कमी पर्जन्यमान २०१५ या वर्षात झाले आहे. त्यामुळे सदर धरणामध्ये कमी पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली.

(२) नाही.

दि.२७/०५/२०१६ रोजीच्या उपलब्ध पाणीसाठ्यानुसार दि.१५/०७/२०१६ पर्यंत मंजूर परिमाणाच्या ३५ टक्के कपात अथवा पाणी उचलण्याच्या संस्थेच्या सोईनुसार आठवड्यातुन दोन दिवस पाणी उचल बंद ठेवण्याबाबत क्षेत्रिय स्तरावर अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ यांचे कार्यालयात निर्णय घेण्यात आला होता.

(३) याबाबत क्षेत्रिय स्तरावर वेळोवेळी उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन जुलै, २०१६ पर्यंत पाणीसाठा सुरळीत ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खरपुडी (ता.खेड, जि.पुणे) येथील भीमा नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्याचे ढापे शेतकऱ्यांनी पाण्यासाठी फोडल्याबाबत

(३) ६४४३६ (२४-०८-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरपुडी (ता.खेड, जि.पुणे) येथील भीमा नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्याचे ढापे शेतकऱ्यांनी अनधिकृतपणे काढल्याने दिनांक ४ मे, २०१६ रोजी नदीपात्रात लाखो लिटर पाणी वाहून गेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीवरील बंधाऱ्यामुळे पाच गावातील शेकडो एकर जमीन अवलंबून असून काही ग्रामस्थ साठविलेले पाणी रात्रीच्यावेळी सोडून देतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, साठविलेले पाणी सोडल्यामुळे येथील शेतकऱ्यांना पाण्याची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बंधाऱ्याचे ढापे अनधिकृतपणे काढणाऱ्या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०१-२०१८) : (१) होय.
(२) दि.०५-०५-२०१६ रोजी पहाटेच्या सुमारास काही शेतकऱ्यांनी परवानगी नसतांना पाणी सोडल्याची घटना घडलेली आहे.
(३) पाणीसाठा सोडल्यानंतर ही बंधाऱ्याच्या जोत्याच्या खालील पाणीसाठा शिल्लक होता व त्याचा वापर शेतकऱ्यांनी सिंचनासाठी केलेला आहे.
(४) बंधाऱ्यांचे ढापे अनधिकृत काढल्यांनतर शाखाधिकारी खेड पाटबंधारे शाखा क्र.१, राजगुरुनगर यांनी दि.०६-०५-२०१६ रोजी पत्रान्वये पोलिस स्टेशन, राजगुरुनगर यांचेकडे लेखी तक्रार दाखल करुन संबंधित शेतकऱ्यांवर कारवाई करण्यासाठी मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने सहाय्यक फौजदार यांनी दि.०७-०५-२०१६ रोजी जागेवर जाऊन संबंधित शेतकऱ्यांना सि.पी.आर. १४९ प्रमाणे नोटीस देवून कार्यवाही केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रलंबित वेतन देण्याबाबत

(४) ७६८०७ (१४-०४-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर काम करणा-या ११५० संग्राम कक्षातील कर्मचाऱ्यांना गत १४ महिन्यापासून वेतन देण्यात येत नसल्यामुळे संबधित कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद,मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन वेतन देण्याची मागणी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रालयीन स्तरावरून योग्य ते आदेश व पत्रव्यवहार जिल्हा परिषदेकडे प्राप्त होऊनही याबाबत दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केलेली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार कर्मचा-यांना रुजु करून घेऊन प्रलंबित वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

याबाबत दि.१९-१-२०१७ च्या जिल्हा परिषदेच्या पत्र क्र. जाक्र. जिपसो/साप्रवि-२/मुलकी-३/५५/२०१७ अन्वये सुचना देण्यात आल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

१) संग्राम प्रकल्प बंद करण्यात आला आहे.

२) राज्यातील ग्रामपंयाचतीमध्ये "आपले सरकार सेवा केंद्र (ASSK)" उभारणी व अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सुचनांचा शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार नवीन आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पामध्ये CSC-SPV या कंपनी मार्फत कर्मचारी नेमणूका करण्यात येत आहेत.

बुलढाणा जिल्हयातील चिखली-साखरखेर्डा रस्त्याची झालेली दुरवस्था

(५) ७६९३८ (१२-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील चिखली आगार परिवहन महामंडळाकडून चिखली-रोहडा-गांगलगाव-कवठळ-मेरा-साखरखेर्डा जाणा-या बसफे-या सदर रस्ता खराब झाल्यामुळे सहा महिन्यापासून बंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) : (१) अंशत: खरे आहे. चिखली आगार परिवहन महामंडळाकडून चिखली रोहडा गांगलगाव कवठळ साखरखेर्डा ही बसफेरी दि.१२.७.२०१६ पासून चिखली ते कवठळ अशी करण्यात आली आहे. परंतु चिखली गांगलगाव कवठळ साखरखेर्डा या सर्व गावांमध्ये इतर वेगवेगळ्या मार्गाने बसफे-या सुरु आहेत.

(२) कवठळ ते प्रमुख जिल्हा मार्ग ३३ ला जोडणा-या ग्रामीण मार्ग क्र. ११२ च्या रस्ता दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ जिल्हा नियोजन विकास निधी अंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत असलेल्या जिल्हयातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाची झालेली दुरवस्था

(६) ७८७२७ (१४-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अंतर्गत असलेल्या जिल्हयातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाची दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी पुरेसा निधी मिळत नसल्याने ग्रामीण भागातील लोकांची गैरसोय होत असून जिल्हयाभरातील इजिमा व ग्रामीण मार्गापैकी पाच तालुक्यातील ३७२ किलोमीटरचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्याचे प्रस्तावित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) चंद्रपूर जिल्हयामध्ये कोळसा खाणी, सिमेंट प्रकल्प, वाळू, चुनखडी खदानी व वने ही खनिजे जास्त प्रमाणात असल्यामुळे जिल्हयातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गावरील अवजड वाहतुक वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. वाढीव वाहतुक वर्दळीमुळे प्रभावित रस्ते दर्जोन्नत करणे आवश्यक असल्याने इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गापैकी ११९६.४५ कि.मी. चे रस्ते दर्जोन्नत (प्रमुख जिल्हा मार्ग) करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्याप्रमाणे मुल, पोभुर्णा, चंद्रपूर व बल्लारपूर या चार तालुक्यातील इजिमा १७९.०० कि.मी. व ग्रा.मा. ४७.०० कि.मी.अशी एकूण २१६.०० कि.मी. रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय , रवियो-२०१७/प्र.क्र.०२/ नियोजन-२ मंत्रालय, मुंबई दि.६ फेब्रुवारी,२०१७ नुसार प्रमुख जिल्हा मार्ग दर्जोन्नत करण्यास मंजूरी प्राप्त आहे.
(३) सदर रस्ते प्रमुख जिल्हामार्ग म्हणून दर्जोन्नत झालेले असल्यामुळे त्यांची देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत करणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हयातील ग्रामीण भागातील रस्ते कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्हा परिषदेला प्राप्त झालेला निधी अखर्चीत असल्याबाबत

(७) ७८७४५ (१९-०४-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील ग्रामीण भागातील रस्ते कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्हा परिषदेला प्राप्त निधीपैकी ६ कोटी १० लाखांचा निधी गेल्या दोन वर्षात खर्च झाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदरचा निधी खर्च करण्यास विलंब लावणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) : (१) होय, हे खरे आहे. रु. ६ कोटी २६ लक्ष निधी अखर्चित राहिला आहे.
(२) व (३) या संदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हा परिषदेला जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु. ११८६.८७ लक्ष निधी प्राप्त झाला होता. सदर निधीमधून रु. ५६०.२२ लक्ष निधी खर्च झाला असून काही तांत्रिक कारणामुळे रु. ६२६.६५ लक्ष निधी अखर्चित राहिला आहे. प्रचलीत नियमानुसार जिल्हा परिषदेने अखर्चित निधी शासन खाती जमा केलेला आहे.

निधी अखर्चित राहण्यास जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याबाबत जिल्हा परिषद अकोला यांना शासन स्तरावरुन कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाडयासाठी पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी गोदावरी खो-यात वळविण्याबाबत

(८) ७९४५० (१५-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयातील गोदावरी नदीवर बांधलेल्या जायकवाडी धरणातील पाण्याची तूट मा.उच्च न्यायालयाच्या अलीकडच्या समन्यायी पाणी वाटप निवाडयातसुध्दा नमूद करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी गोदावरी खो-यात वळविण्यासाठी सहा महिन्यात निर्णय घेण्याच्या सूचनाही मा.उच्च न्यायालयाला दिल्या आहेत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयाच्या सूचनेनुसार मराठवाडयासाठी पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी गोदावरी खो-यात वळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१२-१२-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २३/०९/२०१६ च्या PIL १७३/२०१३ च्या आदेशातील मुद्यावरुन दिसून येते.
(२) अंशत: खरे आहे.

मा. उच्च न्यायालयाने प्रवाही वळण योजनांची कामे १ वर्षात पूर्ण करावीत असे आदेश दिलेले आहेत.

(३) पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खो-यात वळविणा-या २३ प्रवाही वळण योजनांची कामे विविध टप्प्यात प्रगतीपथावर आहे. एकूण २३ पैकी ११ प्रवाही वळण योजना पूर्ण असून ६ योजनांची कामे चालू आहेत, तसेच ३ प्रवाही वळण योजनांचा तत्वत: मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे व २ प्रवाही वळण योजना तूर्त वगळण्यात आल्या आहेत व १ योजना लोकविरोधामुळे चालु झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कोकाकोला शीतपेय कंपनी आदिवासी गावपाडयांचे पिण्याचे पाणी विनापरवाना वापरत असल्याबाबत

(९) ८२६३६ (१७-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कोकाकोला कंपनी शीतपेय तयार करण्याकरिता परिसरातील आदिवासी गावपाडयांचे पिण्याचे पाणी वापरत असल्याबाबत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर कंपनीच्या ठिकाणी नैसर्गिक नाल्याला माती भराव करुन नाला नष्ट केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१२-१२-२०१७) : (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विहिरी, उपसा सिंचन आणि पाटबंधारे प्रकल्पाच्या माध्यमातून ऊस क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याबाबत

(१०) ८२७७४ (१५-०४-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विहीरी, उपसा सिंचन आणि पाटबंधारे प्रकल्पाच्या माध्यमातून ऊस क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१२-१२-२०१७) : (१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने पथदर्शक तत्त्वावर टेंभू उपसा योजना, भिमा(उजनी),मुळा,निम्न मानार, हतनुर, उर्ध्व पुस,कान्होळी नाला व अंबोली या ८ पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात बारमाही पिकासाठी ठिंबक व तुषार सिंचन पध्दतीचा जून २०१७ पासून अवलंब करण्याबाबत अधिसूचना जानेवारी २०१५ मध्ये काढली आहे.

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या जानेवारी २०१५ मधील अधिसुचनेनुसार उपरोक्त ८ पाटबंधारे प्रकल्पांवर ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब करण्याची अंमलबजावणी झाल्यानंतर आलेल्या अनुभवाच्या आधारे हा निर्बंध राज्यातील अन्य पाटबंधारे प्रकल्पांवर जून २०१९ पासून सर्व बारमाही पिकांना सुक्ष्मसिंचनाद्वारे पाणीपुरवठा करणे बंधकारक करणे नियोजीत आहे.

शासनाने नव्याने पारंपारिक वितरण प्रणाली ऐवजी नलिका वितरण प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय शा.नि. १३/१/२०१७ रोजी घेतलेला आहे.

सिंचन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात सुक्ष्म सिंचनाचे अंतिम उद्दिष्ट ठेवून वितरण व्यवस्था करण्याचे धोरण शा.नि. दि. २/५/२०१७ नुसार निश्चित करण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुर्तिजापूर (जि.अकोला) येथील लागवड अधिका-यांनी रोजगार हमी योजनेच्या कामात केलेला गैरव्यवहार

(११) ८२९५१ (१९-०४-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यायालयात हजर असलेल्या मजुरांना रोजगार हमीच्या कामावर दाखवून त्यांना मजुरी दिल्याचा प्रकार मुर्तिजापूर (जि.अकोला) येथील लागवड अधिका-यांनी केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार रोजगार हमीच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या लागवड अधिकाऱ्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (०२-०१-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) चौकशीमध्ये सदर मजूर दुपारी जेवणाच्या सुट्टीमध्ये ५-६ कि.मी. अंतरावर मुर्तिजापूर येथे असलेल्या दिवाणी न्यायालयात सायकलवरुन अर्ध्या तासात जाऊन परत आले. त्यामुळे त्यांचे कामाचे कालावधीत कोणताच खोळंबा झाला नाही व यामुळे कामामध्ये गैरव्यवहार झाला असे म्हणता येणार नाही.

(३) कोणताही गैरव्यवहार लागवड अधिकारी यांनी केल्याचे निदर्शनास न आल्यामुळे कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. तरी भविष्यात योग्यती खबरदारी घ्यावी म्हणून प्रकरणी लागवड अधिकारी यांना ताकीद देऊन भविष्यात उचित खबरदारी घेणेबाबत सुचना केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे म्हाळस पिंपळगाव,वखारवाडी मागे चांदा येथे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था

(१२) ८३३१३ (१७-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडाळा बहिरोबा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथून चांदा येथे जाण्यासाठी जवळचा मार्ग असलेल्या म्हाळस पिंपळगाव,वखारवाडी मार्गे चांदा येथे जाणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून संपूर्ण डांबर निघाले असून तसेच आजू बाजूची काटेरी झुडुपे मोठ्या प्रमाणात रस्त्यात पसरली आहेत,या मार्गात असलेल्या ओढ्यावरील फरशी पूलाचे दगड निखळल्यामुळे रस्ता धोकादायक झाला असल्याने नागरीकांना दळणवळण करण्यास गैरसोईचे जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,त्यानुसार सदर रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) म्हाळस पिंपळगाव व वखारवाडी मार्गे चांदा येथे जाण्यासाठी इतर जिल्हा मार्ग क्र. ३२४ व ग्रामीण मार्ग क्र. १२२ हे दोन रस्ते आहेत. या दोन रस्त्यांची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.
(३) म्हाळस पिंपळगाव, बहिरोबा रस्ता देडगाव, तेलकुडगाव, भातकुडगाव या इतर जिल्हा मार्ग क्र. ३२४ ची एकूण लांबी २९.०० कि.मी. आहे. त्यापैकी १६.९० कि.मी. लांबी डांबरीपृष्ठभाग व १२.१० कि.मी. खडी पृष्ठभाग आहे. त्यापैकी ०/०० ते ०/६०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

वडाळा बहिरोबा-सांगवी-म्हाळस पिंपळगाव ते चांदा ग्रामीण मार्ग क्र.१२२ ची एकूण लांबी ९.०० कि.मी. आहे.त्यापैकी ५.५० कि.मी. डांबरी व ३.५० कि.मी. खडीचा पृष्ठभाग आहे. त्यापैकी ४/२०० ते ५/२०० कि.मी. लांबीचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

उपरोक्त दोन्ही रस्त्यांचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांद्वारे प्राप्त होणा-या निधीमधून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपुर जिल्हयातील गावातील गावठाणातील रहिवासींना भुखंड मिळण्याबाबत

(१३) ८३४४५ (२०-०४-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर जिल्हयातील काटोल व नरखेड तालुक्यातील गावठाणातील रहिवाशी व्यक्तींनी अतिक्रमण नियमानुकुलन करण्याबाबतची मागणी केली असुन यामध्ये ज्या व्यक्तींना शासनाकडुन घरकुल मंजुर झालेली आहेत अश्या व्यक्तींचा सुद्धा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासन निर्णयान्वये गावाच्या गावठाणातील भुखंडाची किंमत एक लक्ष रूपये येत असुन घरकुलासाठी पात्र असलेले लाभार्थी व शेतमजुरांना ही रक्कम भरणे अशक्यप्राय असून, भुखंडाची किंमत ही शिघ्रसिध्दगणकाचे दर जास्त असल्यामुळे भुखंडाचे मुल्य फारच जास्त येत असल्याने लाभार्थी रक्कम शासन जमा करू शकत नाही त्यामुळे घरकुल योजनेपासुन लाभार्थी वंचीत राहतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्यांना निवा-यासाठी भुखंड उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१७) : (१) होय.

(२) शासनाने दि.३०.१२.२०१५ व सुधारित दि.१४.७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजना सुरु केली आहे. या योजनेमध्ये जागा नसलेले घरकुल पात्र लाभार्थींना जागा खरेदीकरीता प्रत्येकी रु. ५०,०००/- पर्यंत अर्थ सहाय्य उपलब्ध करुन देण्याची तरतूद केली आहे. सदर शासन निर्णयामध्ये जागेचे जास्त दर व जागेची कमी उपलब्धता विचारात घेता, ५०० चौ. फूटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली (G+१) किवा तीन मजली (G+२) इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी रु.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य जागा खरेदीसाठी तरतूद करण्यात आली आहे.

(३) मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली दि.२८.२.२०१७ रोजी सभा घेण्यात आली. मा. जिल्हाधिकारी यांनी ज्या गावात गावठाण हद्दीतील जागा उपलब्ध असेल त्या जागेची मागणी करुन घरकुल योजनेकरीता पात्र लाभार्थी यांना उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व खंड विकास अधिकारी, पं.स. (सर्व) व तहसिलदार (सर्व) यांना निदेश दिले आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिरवळ-पळशी-वडगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) या इजिमा रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत

(१४) ८३८०० (१७-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरवळ-पळशी-वडगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) रस्ता हा इजिमा ८ दर्जाचा असून या मोठया प्रमाणावर झालेल्या औद्योगिकरणामुळे तसेच शेती व इतर अनुषंगिक व्यवसायामुळे वाहतुकीची वर्दळ वाढल्याने सदरहू रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हापरिषद सातारा यांना सन २०१५ व २०१६ मध्ये सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार उक्त रस्त्याचे नुतनीकरण तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकित रस्त्याचे सन २०१६-१७ मध्ये सा.क्र.६/५०० मध्ये लहान पूल/मोरी बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे. ०/०० ते ३/५०० कि.मी. या लांबीमध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०११ मध्ये रस्ता डांबरीकरणाचे काम झालेले आहे. सदर लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत ३/५०० ते ७/५०० कि.मी.लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना/रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत प्राधान्यक्रमाने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भटक्या विमुक्त समाजाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबत

(१५) ८४९५८ (१६-०८-२०१७). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या विमुक्त समाजातील बांधवांचे अनेक मुलभूत प्रश्न सोडविले जात नसल्याबाबत लाखो विमुक्त जातीच्या बांधवांनी त्यांच्या अनेक मागण्यांचे निवेदन माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ सदर समाजाला मिळावा अशी मागणी त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (१९-१२-२०१७) : (१) सदर निवेदन आढळून आलेले नाही.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

समन्यायी तत्त्वानुसार समान पाणी वाटप योजना आराखडा तयार करण्याबाबत

(१६) ८५१३७ (१२-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १४ वर्षापासून प्रलंबित असलेल्या जायकवाडी पाणी समस्या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने जुन्या कायदयानुसार पाण्याचा कोटा ठरवून देणारी 'ब्लॉक' म्हणजेच कोटा पध्दत बंद करताना नव्या जलसंपदा प्राधिकरण कायदयानुसार समन्यायी तत्त्वानुसार समान पाणी वाटप योजना आराखडा तयार करण्याचे आदेश देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार समन्यायी तत्त्वानुसार समान पाणी वाटप योजना आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१२-१२-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत रिक्त पदे भरण्याबाबत

(१७) ८५३६९ (११-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत इमारत व दळणवळण उप विभाग, लघु पाटबंधारे उपविभाग, ग्रामपंचायत विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग या विभागांमध्ये १४९ पदे रिक्त असल्याने नांदगांव तालुक्यातील विकास कामांवर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगांव पंचायत समितीच्या सभापती व अन्य पदाधिका-यांनी उपरोक्त रिक्त पदे भरण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे दिनांक ५ व १२ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर निवेदनानुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१८) : (१) होय.

पंचायत समिती नांदगाव येथे सद्यस्थितीत खालीलप्रमाणे विभागवार रिक्त पदे आहेत.

अ.क्र.	विभागाचे नाव	रिक्त पदे
१	सामान्य प्रशासन विभाग	२४
२	कृषि विभाग	०२
३	ग्रामपंचायत विभाग	०८
४	लघुपाटबंधारे विभाग	०३
५	महिला व बालकल्याण	०३
६	शिक्षण विभाग	७३
७	पशुसंवर्धन विभाग	०२
८	अर्थ विभाग	००
९	आरोग्य विभाग	५२
१०	बांधकाम विभाग	०४
	एकुण रिक्त पदे	१७१

(२), (३) व (४) होय.

माहे मे,२०१७ मध्ये शासन धोरणानुसार नाशिक जिल्हयातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागातील रिक्त पदे प्राधान्याने समुपदेशन प्रक्रियेव्दारे पुर्णपणे भरण्यात आली आहेत. सदर प्रक्रियेदरम्यान नांदगाव तालुक्यात बदलीने जाण्यास बहुतांश कर्मचा-यांनी नकार दिल्याने नांदगाव तालुक्यात रिक्त पदांची संख्या जास्त आहे.

सरळसेवा भरतीबाबत शासनस्तरावरुन एकत्रित पदभरतीची कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नतीने पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

सोनुर्ले (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघु पाटबंधारे तलावाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१८) ८५९३१ (१९-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनुर्ले (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघु पाटबंधारे तलावास मंजुरी मिळून १४ वर्षे पूर्ण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावामुळे आजूबाजूचा अनेक परिसर जलयुक्त होणार असून शेतकऱ्यांना शेतीसाठी व अन्य सर्व कामांसाठी मुबलक पाण्याची सोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावासाठी आवश्यक असणाऱ्या भूसंपादनाचे काम पूर्ण झालेले आहे तसेच तलावाचा खर्च पावणे आठ कोटीवरून ३४ कोटीवर पोहोचला आहे, हे ही खरे हे काय,

(४) असल्यास, निधी अभावी सदर प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत व प्रलंबित असून सदर प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२२-०१-२०१८) : (१) होय.

(२) प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ३.६५ द.ल.घ.मी. असून, या प्रकल्पिय पाणीसाठ्यापैकी पिण्यासाठी ०.०१ द.ल.घ.मी. व सिंचनासाठी ३.४४ द.ल.घ.मी. इतका वापर प्रस्तावित असून एकूण ४६५ हे. क्षेत्रास (पीकक्षेत्र ८८४ हे.) सिंचनाचा लाभ मिळणार आहे, मात्र यापैकी औद्योगिकसाठी तरतुद नाही.

(३) होय. प्रकल्पाची मूळ प्र.मा. किंमत रु. ७.७२ कोटी असून, मंजूरीसाठी प्रस्तावित प्रथम सुप्रमा ची किंमत रु. ४६.६४ कोटी आहे.

(४) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पाकरिता रु.१.५० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रकल्पाचा सुप्रमा प्रस्ताव दि.२९/०३/२०१७ रोजी राज्य तांत्रिक सल्लागार समिती-२ पुणे यांना सादर करण्यात आला असून, सदर प्रस्तावाची तांत्रिक तपासणी त्यांचेकडे अंतिम टप्प्यात आहे.

रायगड जिल्हा परिषद/पंचायत समित्यांचे निवडणूकांच्या निकालाची माहिती जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (बेबसाईट) उपलब्ध करुन देण्याबाबत

(१९) ८६०५७ (१८-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विविध शासकीय विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या संकेतस्थळाद्वारे जनतेला अधिकाधिक अद्ययावत माहिती देण्यासाठी प्रयत्नशील असताना रायगड जिल्हा परिषद नागरिकांना माहिती देण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद/पंचायत समित्यांचे निवडणूकांचे निकाल लागून तीन महिने होवूनसुध्दा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (बेबसाईट) कोणतीच माहिती उपलब्ध करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संकेतस्थळावर कोणतीच माहिती उपलब्ध केली जात नसल्याने महत्वपूर्ण व सुधारित योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संकेतस्थळाद्वारे माहिती उपलब्ध करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

रायगड जिल्हा परिषदेची http://zpraigad.maharashtra.gov.in ही वेबसाईट असून जिल्हा परिषदेकडील आस्थापना विषयक व जिल्हा परिषदेच्या विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची अद्ययावत माहिती सदर वेबसाईटवर दरवर्षी प्रसिध्द करण्यात येते. त्यानुसार माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या जिल्हा परिषद निवडणूकीत निवडून आलेल्या सर्व सन्मा. सदस्यांची यादी जिल्हा परिषदेच्या वरील नमूद वेबसाइटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच पंचायत समितीच्या निवडणूकीत निवडून आलेल्या सन्मा. सदस्यांची यादीही उक्त वेबसाईटर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सावली (जि.चंद्रपूर) येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वैनंगगा नदीवरून पाण्याची उचल करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत

(२०) ८६२३५ (१८-०८-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावली (जि.चंद्रपूर) येथे अस्तित्वात असलेली नळयोजना फारच जुनी असून वारंवार नादुरूस्त राहत असल्यामूळे शहरातील हजारो नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत असल्याने सावली नगरपंचायतीने वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून तयार केला असून या वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वैनगंगा नदीवरून पाणी उचल करण्यासाठी जलसंपदा विभागाचे ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांनी प्रस्ताव तयार करून माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, जलसंपदा विभागाकडे पाठविला असता प्रस्ताव प्रलंबित असल्याची माहिती माहे दिनांक १५ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावास वैनगंगा नदीवरून पाणी उचल करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१२-१२-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.
(२) या पाणी आरक्षण प्रस्तावास मान्यता देण्यात आली असुन त्यानुसार जलसंपदा विभाग,शासन निर्णय क्र. बिसिंआ-२०१७/(१५९/१७)/ सिंव्य (धो.),दि.१०.१०.२०१७ निर्गमीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

महाड (जि.रायगड) तालुक्यातील पाणी पुरवठयाचे तीन प्रकल्प तांत्रिक कारणास्तव पडून असल्याबाबत

(२१) ८६४३१ (१९-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील पाणी पुरवठयाचे तीन प्रकल्प तांत्रिक कारणास्तव पडून असून यापैकी कोथरी धरणाचे काम अपूर्णावस्थेत असून प्रकल्पग्रस्तांनाही अद्यापपर्यंत मोबदला दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोथरी धरणाचे काम पूर्ण करण्यासह प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१८) : (१) कोथरी प्रकल्प हा पाणी पुरवठा प्रकल्प नसून लघु पाटबंधारे प्रकल्प आहे. सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

प्रकल्पग्रस्तांना एकूण रु. १२८५.३८ लक्ष इतका पूर्ण मोबदला वाटप महसूल खात्यामार्फत करण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर बंधा-यामध्ये खडकपूर्णा प्रकल्पातून कायमस्वरुपी पाणी देण्याबाबत

(२२) ८६६५१ (१२-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकपूर्णा (जि.बुलढाणा) प्रकल्पाच्या खालील बाजूस असलेल्या कोल्हापूर बंधा-यामध्ये खडकपूर्णा प्रकल्पातून कायमस्वरुपी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर केव्हापर्यंत अंमलबजावणी करण्यात येणार आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१२-१२-२०१७) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) खडकपूर्णा (जि.बुलडाणा) प्रकल्पाच्या खालील बाजूस बांधण्यात आलेली कोल्हापूरी बंधारे स्वतंत्रपणे बांधण्यात आलेले आहे. तसेच प्रत्येक को. प. बंधाऱ्याचे मुक्त पाणलोट क्षेत्र विचारात घेऊन पाण्याच्या येव्याचा अभ्यास करून बंधाऱ्यांचा पाणीसाठा निश्चित करण्यात आलेला आहे. खडकपूर्णा प्रकल्पाच्या पाणी साठ्यातून सदरचे बंधाऱ्यांना पाणी सोडणे अपेक्षित नाही. सदर बंधारे खडकपूर्णा प्रकल्पाचा भाग म्हणून बांधण्यात आलेली नाहीत. खडकपूर्णा

प्रकल्पाचे जलनियोजन अंतीम झालेले असून त्यात प्रकल्पाच्या खालील बाजूस असलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यामध्ये खडकपूर्णा प्रकल्पातुन कायमस्वरुपी पाणी उपलब्ध करून देण्याचा समावेश नाही. तसेच खडकपूर्णा प्रकल्पातून बिगरसिंचन पिण्याच्या पाणी आरक्षणासाठी ३१.७५५८ दलघमीचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहे. सदर पिण्याचे पाणी आरक्षण मंजूर झाल्यास प्रकल्पाची सिंचन क्षमतेमध्ये ७९१८ हे. (३५.८१ टक्के) सिंचन क्षेत्र कपात संभवित आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खालील बाजूस बांधण्यात आलेली कोल्हापूरी बंधाऱ्यांमध्ये कायमस्वरूपी पाणी उपलब्ध करून देणे शक्य नाही.

गिरणा (जि.नाशिक) खोऱ्यातील चणकापूर, पुनंद, हरणबारी आणि केळझर या प्रकल्पांमधील गाळ काढण्याबाबत

(२३) ८७१११ (१८-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणा (जि.नाशिक) खोऱ्यातील चणकापूर, पुनंद, हरणबारी आणि केळझर या सर्वच प्रकल्पांमध्ये मोठया प्रमाणात गाळ साचल्याने ३० ते ३५ टक्के पाणी साठयात घट निर्माण झाल्यामुळे शेती सिंचनासाठी व पिण्यासाठी पाणी मुबलक प्रमाणात मिळत नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीनी व नागरिकांने गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण तसेच मा.जलसंपदा तथा मा.पालकमंत्री यांच्याकडे दिनांक ५ नोव्हेंबर,२०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदरहु प्रकल्पांमधील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०१-२०१८) : (१) अंशतः खरे आहे.

चणकापुर मोठया प्रकल्पाचे गाळ सर्वेक्षणाचे काम मेरी, नाशिक यांनी सन २०१२-१३ मध्ये केले आहे. सदर सर्वेक्षणानुसार उपयुक्त साठयात ८.१३ द.ल.घ.मी. व मृत साठयात ३.११ द.ल.घ.मी. असा एकूण ११.२४ द.ल.घ.मी. गाळ दर्शविण्यात आलेला आहे. स्थानिक शेतक-यांना धरणातील गाळ स्वखर्चाने काढुन नेणे बाबत आवाहन करण्यात आले होते. तथापि शेतक-यांकडुन प्रतिसाद मिळाला नाही.

मध्यम प्रकल्प हरणबारी व केळझर धरणातील गाळ सर्वेक्षणाचे काम मेरी, नाशिक यांनी सन २००७-०८ मध्ये केले आहे. सदर सर्वेक्षणानुसार हरणबारी धरणाच्या जलाशयात गाळ आढळलेला नाही व केळझर धरणाच्या जलाशयातील उपयुक्त साठयात ०.०५ द.ल.घ.मी. इतका गाळ दर्शविण्यात आला आहे. केळझर धरणातील गाळ काढुन नेणेबाबत स्थानिक शेतक-यांना आवाहन करण्यात आल्यानुसार ०.००१८ द.ल.घ.मी. इतका गाळ काढण्यात आलेला आहे.

(२) शासनाने या प्रदेशांतर्गत धरणामधील गाळ लोकसहभागातून स्थानिक शेतक-यांद्वारे गाळ काढणेबाबत क्षेत्रिय स्तरावरून आवाहन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे सुपे (ता.पारनेर,जि.अहमदनगर) येथील नागरिकांना विसापूर तलावातून पाणीपुरवठा करण्याबाबत

(२४) ८७७८३ (१८-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुपे (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील नागरिकांना विसापूर तलावातून पाणी देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तद्नुसार मौजे सुपे येथील नागरिकांना विसापूर तलावातून पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१२-१२-२०१७) : (१) होय.
(२) शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दि. ०७ मे २०१६ अन्वये सुपा ता.पारनेर, जि.अहमदनगर या पाणी पुरवठा योजनेचा समावेश मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP) अंतर्गत करण्यात आला आहे.

तरी, सद्यस्थित मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेसाठी जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील पाणी साठ्यांचा स्त्रोत म्हणुन वापर करावयाचा असल्यास त्यास जलसंपदा विभागाकडील पाणी आरक्षणाच्या मंजूरीची आवश्यकता राहणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (जि.रायगड) तालुक्यातील खिंडवाडी धरणातील गाळ काढण्याबाबत

(२५) ८७८१३ (१२-०८-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील गाव-पाड्यांना पाणी पुरवठा करणा-या खिंडवाडी धरणात चिखल व गाळ साठल्याने सदर धरणातून गाव व पाड्यांना पाणी पुरवठा होत नसल्याने महाडमधील फौजी आंबवडे, शिरवलीसह २५ गावांच्या ग्रामस्थांनी याबाबतची तक्रार निवेदने जिल्हा पाटबंधारे विभागाकडे अनेक वेळा दिली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने धरणाची पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, पाहणीवरुन धरणातील गाळ काढण्याबाबत शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०१-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

खिंडवाडी योजनेच्या प्रकल्पिय अहवालानुसार सिंचन क्षेत्र १२५ हेक्टर (ICA) इतके आहे. परंतू सिंचनासाठी शेतक-यांची मागणी नसल्याने प्रत्यक्षात १० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येत आहे. प्रकल्पामध्ये शिल्लक राहिलेले पाणी हे प्रकल्पाच्या खालील बाजूस असलेल्या १३ गावांच्या पिण्याच्या पाणी पुरवठा करणाऱ्या योजनांना मागणीप्रमाणे धरणातून पाणी सोडण्यात येते.

प्रकल्पातून सिंचनासाठी व पिण्यासाठीची पाणीमागणी पूर्ण करून प्रकल्पात दरवर्षी पाणी शिल्लक राहत असल्याने धरणातील गाळ काढण्याची कार्यवाही केलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सीना (ता.करमाळा, जि.सोलापूर) नदीवरील संगोबा, तरटगाव, बंधा-यावरील पुलाच्या संरक्षक कठड्यांची झालेली दुरवस्था

(२६) ८८०२१ (१२-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीना (ता.करमाळा, जि.सोलापूर) नदीवरील संगोबा, तरटगाव, बंधा-यावरील पुलाचे संरक्षक कठडे ढासळून गेल्यामुळे प्रवाश्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे सरंक्षक कठडे बांधण्याबाबत जलसंपदा विभागाकडे शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव पाठविला असता सदर पुलाच्या कठड्यांच्या कामासाठी जलसंपदा विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास अद्यापपर्यंत निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर पुलाचे कठडे तात्काळ बांधण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१) नाही. संगोबा बंधाऱ्यावरील पुलाचे संरक्षक रेलिंग काही प्रमाणात ढासळलेले आहेत व तरटगाव बंधा-यावरील पुलास गार्ड स्टोन बसविलेले आहेत.

(२) नाही.निधी मागणीचा प्रस्ताव जलसंपदा विभागास प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाकडून मिळालेल्या निधीचा उपयोग कृषी सिंचनासाठी करण्याबाबत

(२७) ८८०२२ (१२-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत "हर खेत मे पाणी" या ध्येयासह राज्यातील २६ महत्वाच्या प्रकल्पांचा केंद्र शासनाकडून ७५ टक्के अनुदानाची रक्कम एकूण ३००० कोटी रुपये राज्य शासनास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी सिंचन योजनेसाठी प्राप्त निधीचा उपयोग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०१-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे. पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतंर्गत "हर खेत मे पाणी" या ध्येयासह राज्यातील २२ महत्वाच्या प्रकल्पापैकी निम्न वर्धा या प्रकल्पाकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून CADWM बाबत रु. १५.१७४० कोटी इतके अनुदान प्राप्त झाले आहे व उर्वरित प्रकल्पाकरिता अनुदान प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(२) प्राप्त निधीनुसार निम्न वर्धा प्रकल्पाच्या CADWM बाबतचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पाडलोस-केणीवाडामध्ये पथ दिवे बंद अवस्थेत असल्याबाबत

(२८) ८८०३५ (१८-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पाडलोस-केणीवाडा मध्ये १४ वा वित्त आयोग ग्रामपंचायतस्तर अंतर्गत वर्षभरापूर्वी बसविण्यात आलेले पथ दिवे वर्षभरातच नादुरूस्त व बंद पडलेल्या अवस्थेत असल्यामुळे ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याने ग्रामस्थांनी पथ दिवे दुरूस्तीची मागणी पाडलोस ग्रामपंचायतीकडे दिनांक २२ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरहू मागणी करूनही आजमितीस कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदरहू पथ दिवे दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) : (१) नाही.
असे कोणतेही निवेदन आजमितीस प्राप्त नाही.
(२) व (३) ग्रामपंचायत पाडलोस केणीवाडा येथे स्ट्रीट लाईट बंद असल्याबाबतची बाब निर्देशनास आल्यानंतर ग्रामपंचायतीने, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, बांदा यांच्या वायरमनशी

संपर्क साधला असता मीटर जळल्याचे निर्देशनास आले. त्यानंतर ग्रामपंचायतीने उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, बांदा यांना कळवून दि. ८.८.२०१७ रोजी मीटर बसवून घेतले व स्ट्रीट लाईट पुन्हा कार्यान्वीत केले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत १४ रिक्त पदांची पदस्थापना करण्याबाबत

(२९) ८८४४४ (११-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत १४ रिक्त पदांची पदस्थापना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (हिंगणघाट) दिनांक ४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास व मा.जलसंधारण मंत्री यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१७) : (१) होय.

(२) व (३) सदर रिक्त असलेली पदे स्पर्धा परीक्षा/पदोन्नतीव्दारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

मौजे शिरसमणी, भोंडण व पोपटनगर (ता.पारोळा, जि.जळगांव) शिवारातील संपादित केलेल्या शेतजमीनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

(३०) ८८४८६ (१८-०८-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरसमणी, भोंडण व पोपटनगर शिवारातील (ता.पारोळा, जि.जळगांव) शेतकऱ्यांच्या शेतजमीन नदीजोड प्रकल्पासाठी सन २००८ मध्ये संपादित करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपादित केलेल्या जमिनीपैकी किती शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे व उर्वरित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१८) : (१) होय.

(२) नदीजोड प्रकल्पासाठी जमीन संपादित केलेल्या एकूण ९६ शेतकऱ्यांपैकी ५१ शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्या पोटी आगाऊ (एडव्हान्स) रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच ५% भाडेपट्टा ही अदा करण्यात आलेला आहे.

सदर नदीजोड प्रकल्पाची कामे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करण्यात येत होती. तथापि, सन २००९-२०१० मध्ये शासनाने नदीजोड अंतर्गत कामांना निधी देणे बंद केला होता. त्या कारणास्तव उर्वरित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला अदा करण्यात आला नाही.

(३) सन २००९ ते २०१३ पर्यंतच्या कालावधीत जुन्या भूसंपादन कायद्याप्रमाणे जमिन संपादनाची कार्यवाही करण्यात येऊन जमिनीची संयुक्त मोजणीही पूर्ण करण्यात आली होती. तथापि, २०१३ मध्ये नविन भूसंपादन कायदा अस्तित्वात आल्याने सन २०१३ च्या नवीन भूसंपादन कायद्यानुसार संबंधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला अदा करणेसाठी भूसंपादन प्रस्ताव तयार करुन जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडून ५२-अ चे आदेश पारीत करण्यात येऊन उपविभागीय अधिकारी, भाग एरंडोल यांनी २/३ रकमेची मागणी केली असून लवकरच सदरची रक्कम उपविभागीय अधिकारी एरंडोल यांच्याकडे अदा करण्याची कार्यवाही तापी पाटबंधारे विकास महामंडळामार्फत करण्यात येत असून शेतकऱ्यांना सदर रक्कमेतून ५०% मोबदला प्रांत कार्यालयामार्फत अदा होऊ शकेल.

जिल्ह्यातील नदीजोड अंतर्गत कामांना भूसंपादनासाठी निधी देणे बाबतचा जलसंपदा विभागाने धोरणात्मक निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.(१८७/२०१७)/लपा-१,दि. २३.०८.२०१७ नुसार घेतला असून त्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समिती जळगाव यांना भूसंपादनासाठी निधीची मागणी करण्यात आलेली आहे. निधी प्राप्त झाल्यावर संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या संपादीत जमिनीचा मोबदला लवकरच अदा करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे नगर-कल्याण महामार्गावरील लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची झालेली दुरवस्था

(३१) ८८५७८ (१८-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे नगर-कल्याण महामार्गावर मांडओहळ मध्यम प्रकल्प व काळू बृहप लघु पाटबंधारे प्रकल्पांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या वसाहतीची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर वसाहतीमध्ये अनेक वाहने बेवारस असून यामध्ये शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर वसाहतीच्या नुतनीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१८) : (१) होय.
(२) ही वाहने जलसंपदा विभागाची नसून जलसंधारण विभागाशी संबंधीत आहे. याबाबत संबधित विभागास वारंवार कळविण्यात आले आहे.
(३) सदर वसाहतीत १९७८-७९ मध्ये मांडओहळ मध्यम प्रकल्पाचे कामासाठी बांधण्यात आलेली आहे. यामध्ये ३३ तात्पुरत्या इमारती (Temporary Quarter) व ६ कायमस्वरुपी इमारती आहेत. प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असल्याने तसेच तात्पुरत्या इमारतीचे आयुष्यमान ३७ वर्षे झाल्याने संपुष्टात आले आहे. कायमस्वरुपी इमारती देखभाल दुरुस्ती निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यात १९९८ ग्रामपंचायतींमध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून गावामध्ये जलव्यवस्था करण्याबाबत

(३२) ८८६०८ (२२-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात १९९८ ग्रामपंचायतींमध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून गावांमध्ये स्थानिक पातळीवर पाणी समस्या सोडविण्याकरीता प्राधान्य देण्याचे शासनस्तरावरून आदेश देण्यात आले असतानाही व ११४ कोटी निधी ग्रामपंचायतींकडे शिल्लक असतानाही गावामध्ये जलव्यवस्थापनासाठी खर्च करण्यात न आल्याने ग्रामीण भागामध्ये जलसमस्या कायम असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ११४ कोटी शिल्लक असतानाही जिल्ह्यातील गावांमध्ये जलव्यवस्थापनाची कामे न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त बाबींची चौकशी केली आहे काय व त्यानुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) : (१) यवतमाळ जिल्ह्यामध्ये ११९८ ग्रामपंचायती असून सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात १४ व्या वित्त आयोगांतर्गत एकूण रू.१५१,६६,४१,०८२/- इतका निधी RTGS व्दारे ग्रामपंचायतींला वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच, दि. ४ नोव्हेंबर,२०१५ च्या शासन निर्णयानुसार ग्रामविकास आराखडा तयार करून निधीचे नियोजन करण्यात आलेले आहे. ग्रामविकास आराखड्यात दि. २१ डिसेंबर,२०१५ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्राधान्य क्रमानुसार ग्रामसभेमध्ये सुचविलेल्या कामानुसार कामे घेण्यात आलेली आहे. यानुसार पाणी पुरवठा स्त्रोतांचे बळकटीकरण व पाणी पुरवठा साधनांची दुरूस्ती या कामाकरीता प्राधान्य देण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे ३५४ ग्रामपंचायती इंटरनेट सेवेविना कार्यरत असल्याबाबत

(३३) ८८६१२ (१२-०८-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे ३५४ ग्रामपंचायतींमध्ये सद्यस्थितीत इंटरनेट सेवा उपलब्ध नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ग्रामपंचायतींना तातडीने इंटरनेट सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१८) : (१) होय.

(२) रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण ८४५ ग्रामपंचायतीपैकी ३१९ ग्रामपंचायतीमध्ये BSNL Broad Band व इतर खाजगी कंपन्यामार्फत इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे.

उर्वरीत काही तालुक्यामध्ये ऑप्टीकल फायबरचे काम प्रगती पथावर आहे व काही तालुक्यातील ऑप्टीकल फायबर नेटवर्कचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत भारत संचार निगम लि., रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रेठरे धरण (ता.वाळवा, जि.सांगली) येथील पाटबंधारे विभागातंर्गत मध्यम प्रकल्पाच्या कॅनॉलमध्ये पाणी सोडण्याचे गेट नादुरुस्त असल्याबाबत

(३४) ८८६२५ (१२-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेठरे धरण (ता.वाळवा, जि.सांगली) येथील पाटबंधारे विभागांतर्गत मध्यम प्रकल्पाच्या कॅनॉलमध्ये पाणी सोडण्याचे गेट नादुरुस्त असल्याने मागील कित्येक वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावातील पाण्याची मोठया प्रमाणात गळती होऊन पावसाळयानंतर अल्पावधीत सदरहू तलाव रिकामा होत असल्याने स्थानिक शेतक-यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने सदरहू गेटची तातडीने दुरुस्ती करावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत शेतक-यांनी संबंधित अधिका-यांकडे लेखी अर्ज करुनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावाची पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर गेटची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१) रेठरे धरणाच्या विमोचक गेटचे दुरुस्तीचे काम जून २०१७ मध्ये पूर्ण करुन घेणेत आले आहे.
(२) व (३) ल.पा. रेठरे धरणाच्या गेट मधून होणारी गळती थांबविण्यासाठी गेटची आवश्यक ती दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करुन घेण्यात आली आहे. तथापि, विमोचकाच्या शेजारुन इतर भागातून होणारी पाण्याची गळती थांबविण्याचे काम शासनाच्या जलयुक्त शिवार योजने अंतर्गत प्रस्तावित करुन त्यास मान्यता घेऊन निविदा प्रसिध्दीस देण्यात आली होती, तथापि सदर निविदेस प्रतिसाद मिळालेला नसल्याने पर्यायी उपाय योजना काय करता येईल, याबाबत प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर दि. २४/१०/२०१७ रोजी कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांनी पाहणी केली आहे. याबाबत धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांचेकडून अभिप्राय प्राप्त होताच गळती थांबविण्याबाबत उपाय योजना करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगांव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील शेतक-यांची पाण्याअभावी होणारी गैरसोय

(३५) ८८८६८ (११-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगांव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील शेतक-यांची पाण्याअभावी होणारी गैरसोय दूर करण्याकरिता टिमटाळा (संग्राहक) लघु पाटबंधारे प्रकल्प आवश्यक असुन यामुळे भुजल पातळीमध्ये वाढ होणार असल्याचे माहे एपिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागात सिंचनाचे क्षेत्र अत्यंत कमी असल्याने सदरहू ल.पा. प्रकल्प होणे आवश्यक असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१) होय.
(२) वनजमिन हस्तांतरण प्रश्न जनहित याचिका क्र. १२४/२०१४ संदर्भात मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे निदेश व प्रकल्प व्यवहार्यता इ.मुळे सदर प्रकल्पाचे काम स्थगित होते. तथापि, टिमटाला प्रकल्प सुरु ठेवण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाथ्रट गोळे (ता.नेर) व चांदूर (जि.अमरावती) तालुक्यातील मालखेड, टाकळी, सरस्वती, आमदरी, भिवापूर या लघूसिंचन योजनेंतर्गत सिंचनासाठी कालव्या ऐवजी पाईपलाईनद्वारे वितरण व्यवस्था करण्याबाबत

(३६) ८८९१६ (१८-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथ्रट गोळे (ता.नेर) व चांदूर रेल्वे (जि.अमरावती) व चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील मालखेड, टाकळी,सरस्वती, आमदरी, भिवापूर या लघूसिंचन योजनेअंतर्गत सिंचनासाठी कालव्या ऐवजी पाईपलाईनद्वारे वितरण व्यवस्था करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता यांना पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१८) : (१) लोक प्रतिनिधींचे असे पत्र नाही. तथापि, महाराष्ट्र विधान मंडळाचे पहीले अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१७ मध्ये कपात सूचना क्र.२४ अन्वये सदरची मागणी झालेली आहे.

(२) या कार्यालयाअंतर्गत असलेले पाथ्रट गोळे, मालखेड, टाकळी, सरस्वती, आमदरी, भिवापूर हे लघु प्रकल्प पूर्ण झालेले असून अशा पूर्ण झालेल्या प्रकल्पांकरिता कालवे व वितरण प्रणाली अस्तित्वात असून पारंपारिक पद्धतीने कालव्याद्वारे सिंचनाचा लाभ लाभक्षेत्रातील गांवाना मिळत आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत पाईपलाईनद्वारे पुन:श्च वितरण व्यवस्था निर्माण करण्याचे नियोजन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली भुतीवली धरणाचे पाणी शेतीसाठी देण्याबाबत

(३७) ८९७२७ (२२-०८-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील रेल्वेपट्टा भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी तसेच शेतीला पाणी देण्यासाठी शासनाने पाली भुतीवली धरणाची निर्मिती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणातील पाणी कोणत्याही खाजगी संस्थेला देण्यात येऊ नये म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी स्थानिक पाटबंधारे विभाग, कर्जत यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले असुनसुध्दा कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणातील पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी सोडण्याकरिता कालव्यांची कामे सुरळीत न झाल्याने अद्यापपर्यंत धरणाचे पाणी शेतीसाठी पोहचू शकले नाही तसेच धरणातील पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी असताना पोद्दार या खाजगी बिल्डरला पाणीपुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कालव्यांची कामे सुरळीत करुन धरणाचे पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१८) : (१) होय.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे.

पोद्दार डेव्हलपर्स यांचा पूर्वीचा करारनामा दिनांक १५.१२.२०१६ रोजी संपला असल्याने, शेतीकरिता पाणी मागणी अर्ज प्राप्त न झाल्याने दिड पट आकारणी करून पाणी पुरवठा केला आहे.

(३) सदर योजनेच्या ८ कि.मी. लांबीच्या उजव्या कालव्यापैकी ३.७५ कि.मी. लांबीचा कालवा पूर्ण झाला आहे व ७ कि.मी. लांबीच्या डाव्या कालव्यापैकी ०.८० कि.मी. लांबीचा कालवा पूर्ण झाला आहे. या दोन्ही कालव्यांची उर्वरित कामे भूसंपदान व निधी अभावी अपूर्ण असल्याने धरणाचे पाणी शेतीला पोहचू शकले नाही. दि.९.६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार कालाव्यांची उर्वरित कामे बंदिस्त पाईपलाईनद्वारे प्रस्तावित आहेत.

मंजूर प्रकल्प अहवालात ०.४२५ दलघमी पाणी पिण्यासाठी राखीव आहे. पिण्यासाठी राखीव असलेल्या तरतुदीतून पोद्दार या खाजगी बिल्डरला घरगुती पाणी वापरासाठी ६ वर्षासाठी मंजूर करारनाम्यानुसार माहे डिसेंबर २०१० ते डिसेंबर २०१६ पर्यंत पाणी पुरवठा करण्यात येत होता, तो संपुष्टात आला आहे.

पुढील कालावधीकरीता ०.३९४ दलघमी (१.०७ दललि/दिन) पाणी आरक्षण प्रस्तावास महामंडळ कार्यालयाने मंजुरी दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळामधील कार्यरत लेखापाल व वसुली निरिक्षक कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतन श्रेणी लागू करण्याबाबत

(३८) ८९९२५ (१८-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळामधील कार्यरत लेखापाल व वसुली निरिक्षक कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन धोरणानुसार सुधारीत वेतन श्रेणी मिळत नसल्याने त्याबाबत मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २५ मे, २०१५, २६ फेब्रुवारी, २०१६, ११ मार्च, १०१६, १४ मे, २०१६ व २३ मे, २०१६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीनी पत्र दिले असता त्यावर मा.मुख्यमंत्री यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे व्यवस्थापकीय संचालक, इ.मा.वि. महामंडळ यांना निर्देश देवूनही अद्यापही सुधारीत वेतन श्रेणी लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू फाईल क्र. १९३७०५ सामाजिक न्याय ची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदर अन्यायग्रस्त ८ कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतन श्रेणी तात्काळ लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (१९-१२-२०१७) : (१) होय.
(२) व (३) याबाबत वित्त विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

घनसावंगी व अंबड (जि.जालना) तालुक्यातील पाझर तलाव, साठवण तलाव, बॅरेजेसमध्ये संपादीत केलेल्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

(३९) ८९९५० (१८-०८-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घनसावंगी व अंबड (जि.जालना) तालुक्यातील पाझर तलाव,साठवण तलाव,बॅरेजेस मध्ये संपादीत झालेल्या जमिनींचा मोबदला संबंधीत शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास,चौकशीनुसार सदरील जमिनीचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१८) : (१) होय.
या महामंडळा अंतर्गत घनसावंगी व अंबड (जि. जालना) या तालुक्यात एकूण १२ लघु प्रकल्प, १ को.प.बंधारा व ३ उच्च पातळी बंधारे अशा एकूण १६ प्रकल्पांसाठी ८३.१२ हे. भूसंपादनाची आवश्यकता आहे. त्यापैकी ६९.७९ हे. जमीन संपादीत करण्यात आलेली असून संपादीत क्षेत्राचा मावेजा संबंधीत शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेला आहे. उर्वरित १३.३३ हे. क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगत असून, त्यासाठी एकूण रु. ८४८.९३ लक्ष मावेजा वाटपाचे नियोजन आहे.
(२) भूसंपादनाची कार्यवाही प्रगत असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे बंदलगी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील सिना नदीवरील बंधाऱ्याची पुनर्बांधणी करण्याबाबत

(४०) ९००८९ (१८-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बंदलगी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील सिना नदीवरील बंधारा माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान सिना नदीला पूर आल्यामुळे पुर्णपणे वाहून गेल्याने सदर नदीवरील बंधारा बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधाऱ्याची पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१) याबाबत मा.मंत्री, सहकार पणन व वस्त्रोद्योग यांचे दि.२० जून २०१७ चे पत्र प्राप्त आहे.

(२) उक्त बंधा-याच्या किमान पाणीसाठा करणे यासाठी आवश्यक दुरुस्तीचे रु.३०.६९ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक अ.अ. ला.क्षे.वि. प्राधीकरण कार्यालयाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे सन २०१७-१८ च्या जलयुक्त शिवार कार्यक्रमामध्ये समाविष्ट करणेस्तव दि.२०/०७/१७ रोजी सादर केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हयातील ११ धरणातील पाणीसाठा वापराविना पडुन असल्याबाबत

(४१) ९०३२५ (२२-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मुरबाड आणि शहापुर तालुक्यातील ११ धरणातील पाणीसाठा वापराविना पडुन असल्याची बाब माहे जून मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणातील पाणी परिसरातील स्थानिक नागरीकांना देण्याबाबत मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार उक्त धरणातील पाणी स्थानिक नागरीकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१३-१२-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हयातील मुरबाड व शहापूर तालुक्यात भातसा मोठा प्रकल्प तसेच ११ पूर्ण झालेल्या व २ बांधकामाधीन लघु पाटबंधारे योजना आहेत. त्यापैकी पाडाळे धरणातील पाणीसाठयाचा सिंचनासाठी व बिगर सिंचनासाठी उपयोग झालेला दिसून येत नाही.

(२) होय.
(३) स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी मा.श्री.किसन कथोरे, आमदार, मुरबाड विधानसभा क्षेत्र, जि. ठाणे यांच्या दि.२६/०२/२०१६ च्या पत्रान्वये केलेल्या मागणीनुसार क्षेत्रिय स्तरावरुन दि.१२/०३/२०१६ ते दि.०३/०५/२०१६ या कालावधीत २.२५ द.ल.घ.मी. व दि.१९/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या मागणीनुसार दि.०७/०३/२०१७ ते दि.१९/०५/२०१७ पाणीटंचाई कालावधीत २.२६२ द.ल.घ.मी. पाणी पाडाळे धरणातून नदीपात्रात पिण्यासाठी व जनावरांसाठी सोडण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(४२) ९०३९३ (११-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागात आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यात आले असले तरी येथील ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेटची सुविधा नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर केंद्राना इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१८) : (१) नाही.
(२) काही ठिकाणी तांत्रिक अडचणीमुळे जसे की रेंज न मिळणे,स्पिड कमी जास्त होणे याकारणांमुळे काही वेळी अडचणी निर्माण होतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील लघु सिंचन प्रकल्पांतर्गत संपादीत केलेल्या शेतजमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

(४३) ९१४७२ (१९-०९-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील विविध लघु सिंचन प्रकल्पांतर्गत बाधीत शेतक-यांच्या शेतजमिनी अधिग्रहीत करण्यात आलेल्या असून त्यापैकी सहा प्रकरणामधील शेतक-यांना

अद्यापही अधिग्रहीत शेतजमिनीचा मोबदला मिळालेला नसल्याने आता शेतक-यांना वाढीव दराने मोबदला दयावा अशी मागणी शेतकरी करीत असून या संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०१-०१-२०१८) : (१) नाही, असे निवेदन जलसंपदा विभागाकडे प्राप्त झालेले नाही.

(२) वर्धा जिल्हयातील सुकळी लघु प्रकल्पातील ६ प्रकरणाचे (२२.९३ हे., ९० भूधारक) अंतिम निवाडे न झाल्यामुळे सदर जमीन सरळ खरेदीने संपादीत करण्याची कार्यवाही सुरु असून त्यापैकी (७.६५ हे., ३७ भूधारक) क्षेत्राकरिता मोबदला वाटप करण्यात आला आहे. उर्वरीत (१५.२८ हे.,५३ भूधारक) क्षेत्रासाठी जमीन सरळ खरेदीने संपादीत करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

हिवर्डा (जि.उस्मानाबाद) येथील हिवर्डा लघु प्रकल्पाचा सांडवा फुटून शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

(४४) ९१९५१ (२१-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवर्डा (जि.उस्मानाबाद) येथील हिवर्डा लघु प्रकल्पाचा सांडवा दिनांक २२ सप्टेंबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास अतिवृष्टीमुळे फुटल्याने परिसरातील शेती, पाईपलाईन वाहून गेली, विहिरीमध्ये गाळ साचला त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याने सांडवा दुरुस्त करावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,

(३) असल्यास, चौकशीनुसार सांडवा दुरुस्त करण्यासह शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१) होय. सदर निवेदन मा.मंत्री, जलसंधारण यांचेकडे प्राप्त झाले होते व सदर निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे दिनांक १५/०७/२०१७ रोजी पाठविले आहे. तथापि सदर लघु पाटबंधारे प्रकल्प जलसंपदा विभागाचे अधिपत्याखाली आहे.

(२) होय.

(३) हिवर्डा लघु प्रकल्पाचा अतिवृष्टीमुळे सांडवा फुटला नसून पुच्छ कालव्यात असलेली drop well च्या डाव्या बाजूने (out flanking) होऊन जमीन खचली आहे व बाजूने पाणी वाहून गेले आहे. सदरील तलावाच्या सांडवा भागातील वाहून गेलेला भराव काम यांत्रिकी विभागाच्या मशिनरीने अंशत: करण्यात आले आहे व विहिरीतील गाळ काढून देण्यात आला आहे. तसेच शेतकऱ्यांचे नुकसानीचे पंचनामे महसूल व कृषी विभागाकडून अहवाल प्राप्त झालेनंतर नुकसान भरपाईबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली (जि.हिंगोली) तालुक्यातील नवलगव्हाण येथे जलसंपदा विभागातंर्गत करण्यात येणाऱ्या तलावाचे काम अपूर्ण असल्याबाबत

(४५) ९२३०६ (१८-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली (जि.हिंगोली) तालुक्यातील नवलगव्हाण येथे जलसंपदा विभागाच्या वतीने करण्यात येणाऱ्या तलावाचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे परंतू १५ टक्के उरलेल्या कामामुळे तलाव अद्यापही अपूर्ण राहिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवलगव्हाण येथील उर्वरीत १५ टक्के काम पूर्ण करण्यासाठी रेल्वे हद्दीतील ५ हेक्टर जमीन बुडीत भागात येत असल्याने रेल्वे विभागाने नवलगव्हाण तलावाचे काम बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१८) : (१) होय.
(२) हे खरे आहे.
(३) नवलगव्हाण लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ७६.८५ हेक्टर क्षेत्रापैकी ५.१० हेक्टर जमिन रेल्वे खात्याची आहे. धरणाच्या बुडीत क्षेत्रामुळे जवळपास ४८० मी. रेल्वेलाईन बाधीत होते. जलसंपदा विभागाचे अधिकारी व रेल्वेचे अधिकारी यांनी दि.१७-५-२०१७ रोजी संयुक्त पाहणी केली असून रेल्वे विभागाच्या मंजूरीबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नळदुर्ग (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील बॅरेज क्रमांक-१ व बॅरज-२ चे काम प्रलंबित असल्याबाबत

(४६) ९२८१८ (१८-०८-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळदुर्ग (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील बॅरेज क्रमांक-१ व बॅरज-२ च्या कामांकरीता शासनाने मंजूर देऊनही अद्याप प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बॅरेज क्रमांक-१ व बॅरज-२ चे काम पूर्ण करण्याबाबत नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बॅरेज क्रमांक-१ व बॅरज-२ च्या कामाकरीता किती निधी मंजूर केला आहे, उक्त कामाकरीता निविदा काढून प्रत्यक्ष कामास सुरूवात केली आहे काय, त्यापासून किती क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार बॅरेज क्रमांक-१ व बॅरज-२ चे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१) नळदुर्ग बॅरेज क्र.१ ची स्थापत्य कामे माहे जून-१७ पूर्वी जवळपास पूर्ण झाली आहेत. व यांत्रिकी कामे प्रगतीपथावर आहेत.

नळदुर्ग बॅरेज क्र.२ चे काम प्रगतीपथावर आहे. माहे जुलै-२०१७ पर्यंत स्थापत्य कामे २२ टक्के पूर्ण झालेली आहेत.

त्यामुळे सदर दोन्ही बॅरेजेसची कामे प्रलंबीत नाहीत.

(२) होय.

(३) नळदुर्ग बॅरेज क्र.१ ची निविदा प्रक्रिया पूर्ण करून फेब्रुवारी २०१२ मध्ये प्रत्यक्षात कामास सुरवात केली आहे. या प्रकल्पाची सद्यस्थितीत स्थापत्य कामे जवळ जवळ पूर्ण झाली असून, यांत्रिकी कामे प्रगतीपथावर आहेत. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर ७२७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल.

नळदुर्ग बॅरेज क्र.२ ची निविदा प्रक्रिया पूर्ण करून सप्टेंबर २०१४ मध्ये प्रत्यक्षात कामास सुरवात केली आहे. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर ७९२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल.

नळदुर्ग बॅरेज क्र.१ व बॅरेज क्र.२ ही कामे कृष्णा मराठवाडा प्रकल्पाचा भाग असून कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी एकत्रित सन २०१७-१८ मध्ये रु. १२५ कोटी निधीची तरतूद केली आहे.

(४) नळदुर्ग बॅरेज क्र.१ चे काम मार्च २०१८ अखेर पूर्ण करण्याचे उदिष्ठ असून, नळदुर्ग बॅरेज क्र.२ चे काम जून-२०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील कृष्णा-मराठवाडा सिंचन टप्पा क्रमांक-२ च्या प्रलंबित कामांबाबत

(४७) ९२८१९ (२१-०८-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प टप्पा क्रमांक-२ चे काम निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून सदर काम पूर्ण करण्याबाबत

नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प टप्पा क्रमांक-२ चे काम पूर्ण करण्यासाठी निधी देवून तात्काळ काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१)नाही.

तथापी, कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प टप्पा क्रमांक-२ चे काम निधीच्या उपलब्धतेनुसार प्रगतीपथावर आहे.

(२) दिनांक ७/७/२००९ च्या शासन पत्रान्वये प्रकल्पाच्या सुधारित जल नियोजनास मान्यता देण्यात आली असून, सदर मान्यतेवर आधारित कृष्णा मराठवाडा प्रकल्पाच्या रु. ४८४५.०५ कोटी किंमतीच्या सुधारित प्रकल्प अहवालास दिनांक २७/८/२००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

७ टी.एम.सी. पाणी वापरासाठी योजनेचे काम पुढील ४ वर्षात पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे. यासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने या योजनेस लागणारा निधी मा. राज्यपाल महोदयांचे निधी वाटपाचे सूत्राबाहेर ठेवण्याची विनंती मा.राज्यपाल महोदयांना करण्याचा निर्णय मा.मंत्रीमंडळाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नादुरुस्त व अत्यल्प सिंचन क्षेत्र झालेल्या तलावाच्या दुरुस्तीबाबत

(४८) ९२८७२ (२१-०८-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नादुरुस्त व अत्यल्प सिंचन क्षेत्र झालेल्या तलावाची दुरुस्ती करण्याच्यादृष्टिने सिंचन व्यवस्थापनाच्या निधीतुन खर्च करण्याबाबत शासनाने दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सुचविल्यानुसार कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी निधी उपलब्ध करुन दिला आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोण-कोणत्या तलावाच्या कामासाठी किती रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अद्यापी निधी उपलब्ध झाला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड या कार्यालयास दि.२८.०४.२०१७ च्या शासनपत्रातील निर्देशाप्रमाणे व जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. देवदु-२०१५/(८३६/२०१५)/सिंव्य कामे, दिनांक १७.११.२०१६ च्या अनुषंगाने सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात सिंचन व्यवस्थापनाची व देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र.गोमपाविम/ले-४/४४०४,दि.०३.०६.२०१७ नुसार ठोक तरतुद रुपये १२०.८० लाख व महामंडळ आदेश क्र.गोमपाविम/लेखा-४/६४९६,दि.११.०८.२०१७ अन्वये रु.१७.६८ लाख असा एकूण रु.१३८.४८ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) देगलूर तालुक्यातील अंबुलगा ल.पा.प्रकल्पास यामधून रु.१.८६ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व बिलोली तालुक्यातील दर्यापूर ल.पा.प्रकल्पाचे काम विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले असून अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धोंड (ता.पालम, जि.परभणी) या साठवण तलावास निधी मिळण्याबाबत

(४९) ९३०३८ (२१-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धोंड (ता.पालम, जि.परभणी) या साठवण तलावाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक माहे जानेवारी, २०१७ पूर्वी व तद्नंतर अनेक वेळा मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे पत्रद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोंड साठवण तलावामुळे लोहा व पालम या तालुक्यातील जमीनी सिंचनाखाली येणार असून येथील नागरिकांना पिण्यासाठी पाणी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार तात्काळ निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१८) : (१) होय.

(२) होय, धोंड बनवस प्रकल्पाव्दारे ९.०१ दलघमी पाणीसाठा निर्मिती होणार असून यातून लोहा व पालम तालुक्यातील १७५० हे.क्षेत्रास सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

(३) जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत धोंड बनवस या मार्गस्थ जलाशयाचा समावेश आहे. याचा जायकवाडी प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात समावेश असून यासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मुख्य अभियंता, जलविज्ञान यांचेकडून प्राप्त झाले आहे. पाणी उपलब्धतेच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या फेरनियोनाचा प्रस्ताव शासनाकडे तपासणीत आहे.

अनुशेषाबाबत राज्यपालांचे निर्देश व निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खडक कोगे (खाजगी) धरणाच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या वसूलीपैकी ५० टक्के रक्कम संस्थेस देखभाल व दुरुस्तीसाठी मिळण्याबाबत

(५०) ९४२७४ (२१-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभी-नदी सांगरुळ धरण सहकारी सोसायटी, लि., सांगरुळ (ता.करवीर, जि.कोल्हापूर) या संस्थेने सांगरुळ येथे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा सन १९५२ साली बांधलेला असून सांगरुळ बंधाऱ्यास पाणी कमी पडत असलेले खडक कोगे बंधारा या संस्थने सन १९७१ साली स्व:खर्चाने बांधलेला असून या बंधाऱ्याचे एकूण लाभक्षेत्र ८८० हेक्टर इतके आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणावर होणारा देखभाल दुरुस्तीचा खर्च संस्थेस करावा लागत असून तो परवडत नसल्याने खडक कोगे (खाजगी) धरणाच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या वसूली पैकी ५० टक्के रक्कम संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी मिळावी किंवा इतर खाजगी धरण संस्था कार्यक्षेत्रातील आकारणीप्रमाणे ५० टक्के दराप्रमाणे आकारणी करण्याबाबत मा. जलसंपदा मंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रामध्ये बहिरेश्वर, कोगे, कुडित्रे, कुडित्रे, आमशी, खाटांगळे, म्हारुळ व सांगरुळ या सात गांवांचा समावेश आहे तसेच सात गांवाच्या शेतीसाठी व पिण्याच्या नळ पाणी पुरवठा योजनेसाठी याच बंधाऱ्याच्या साठयामधून पाणी पुरवठा होतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील सर्व खाजगी धरण संस्थातील कार्यक्षेत्रामध्ये पाटबंधारे विभागामार्फत ५० टक्के दराने आकारणी करण्यात येते व खडक कोगे (खाजगी) धरणातील गांवाची शेतीची आकारणी पाटबंधारे विभागामार्फत पूर्ण दराने करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१८) : (१) अंशत: खरे आहे. कुंभी नदीवरील सांगरुळ को.प.बंधारा शेवटचा असून त्याखाली संगमापर्यंतच्या क्षेत्रास सिंचनासाठी खडक कोगे हा भोगावती नदीवर खाजगी बंधारा बांधण्यात आला आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) होय हे खरे आहे.

(५) होय, क्षेत्रिय स्तरावरील संबंधित कार्यकारी अभियंता यांनी चौकशी केली आहे.

त्यानुसार कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ८ खाजगी बंधारे असून खडक कोगे हा बंधारा वगळता इतर सातही बंधारे हे त्या त्या नदीवरील प्रकल्पापूर्वीचे आहेत. मात्र खडक कोगे हा बंधारा भोगावती नदीवर राधानगरी प्रकल्पानंतर बांधण्यात आला असून त्यास बारमाही पाणी धरणातून पुरविण्यात येते. या बंधा-याखाली सुध्दा बंधारे असून ते शासनाच्या ताब्यात आहेत. त्यामुळे खडक कोगे बंधा-यावरील क्षेत्रासाठी शासनाच्या दि.२९/६/२०१२ च्या परिपत्रकातील परिशिष्ट क्र.२ मधील अ.क्र.२ नुसार वहनव्ययासहीत नियंत्रीत पाणीपुरवठ्यामधील जलाशयाचा आधार असलेल्या को.प.बंधा-यासाठीच्या दरानुसार आकारणी करण्यात येते आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.